


कुलाबा ते सिप्झ दरम्यानच्या 'मेट्रो ३' प्रकल्पातील मेट्रोगाडीच्या डब्यांच्या प्रतिकृतीचे शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. केंद्र शासनाच्या 'मेक इन इंडिया' संकल्पनेनुसार भारतातच बनवण्यात येणाऱ्या या डब्यांमध्ये वातानुकूलित सहआर्द्रता नियंत्रण, मनोरंजनासाठी एलसीडी टीव्ही, मार्गाचा डिजिटल नकाशा, आकर्षक आसनव्यवस्था असणार आहे. वृत्त...३

# मेट्रो ३च्या डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण

प्रतिनिधी, मुंबई

**'मेट्रो-३'च्या** डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. 'मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन'ने मेट्रो-३चे डबे तयार करण्याचे काम ॲलस्टॉम ट्रान्स्पोर्ट इंडिया लिमिटेड या कंपनीला दिले आहे. मेट्रो ३च्या संपूर्ण भूमिगत मार्गिकेला 'ॲक्वा लाइन' असे संबोधले जाईल. या मार्गिकेसाठी आठ डब्यांच्या एकूण ३१ गाड्या तयार केल्या जाणार आहेत. हे काम नोव्हेंबर महिन्यात सुरू होईल व एक वर्षाच्या आत पहिली गाडी मुंबईत दाखल होणे अपेक्षित आहे.

केंद्र शासनाच्या मेक इन इंडिया या संकल्पनेप्रमाणे मेट्रो ३च्या सर्व गाड्यांची निर्मिती भारतात म्हणजेच ॲलस्टॉम इंडिया यांच्या आंध्र प्रदेशातील श्री सिटी येथील कारखान्यात होणार आहे. हे डबे विनाचालक कार्यान्वयनासाठी सक्षम असतील. कधीही न झोपणारे आणि गतिमान शहर म्हणून प्रचलित असणाऱ्या मुंबईचा विचार करून मेट्रो ३च्या डब्यांची रचना करण्यात आली आहे. मुंबईचा समुद्र, वाहत्या पाण्याचा ताजेपणा आणि गती यावर आधारित रंगसंगती असणार आहे. यामध्ये फिका हिरवा (ॲक्वा ग्रीन) आणि फिका पिवळा (बेज) या रंगांचा वापर करण्यात आला आहे.



'मेट्रो-३'च्या डब्यांच्या प्रतिकृतीचे अनावरण शुक्रवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. मुंबई मेट्रो रेल्वे महामंडळाच्या व्यवस्थापकीय संचालक अश्विनी भिडे यावेळी उपस्थित होत्या.

## डब्याची वैशिष्ट्ये

- संपूर्णतः वातानुकूलित यासह आर्द्रता नियंत्रण व्यवस्था
- सुरक्षित आरामदायी प्रवास
- प्रवाशांच्या मनोरंजनासाठी व जाहिरातीकरिता एलसीडी
- मार्गिकेचा डिजिटल नकाशा
- प्रवाशांसाठी उद्घोषकांचा वापर
- सुंदर बैठक व्यवस्थेसह उभे राहण्यासाठी खांबांची व्यवस्था
- अपंग प्रवाशांची चाकाची खुर्ची ठेवण्यासाठी स्वतंत्र व्यवस्था
- एयर सस्पेन्शन, सीसीटीव्ही, अग्निशमन, धूर व अग्निशोधक यंत्रणा
- आपत्कालीन परिस्थितीत प्रवासी व ट्रेन नियंत्रक यांच्यात संवाद राहण्यासाठी ध्वनिसंवाद यंत्रणा